<u>अनुसूची - अ</u>

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाची मतदार यादी तयार करणे

**<u>मतदार नोंदणी नियम, 1960 च्या नियम 31(3) अन्वये नोटीस</u>**

1. मतदार नोंदणी नियम, 1960 च्या नियम 31(3) नुसार खालील **<u>अनुसूची एक</u>** मध्ये नमुद असलेल्या मतदार नोंदणी अधिका-यांपैकी प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी अमरावती विभाग पदवीधर मतदार संघाचे मतदार यादीत नांव नोंदणी करण्यासाठी पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तिस असे आवाहन करतो की, मतदार नोंदणी अधिनियम 1960 याला जोडलेला नमुना 18 मधील (या खालील अनुसूची दोन मध्ये दिलेला) अर्ज 7 नोव्हेंबर 2022 रोजी किंवा त्यापुर्वी खालील अनुसूचीत ज्या अधिका-यांचा तपशिल दिलेला आहे, त्या अधिका-यांकडे या मतदार यादीत नांव समाविष्ट करण्यासाठी त्याने / तिने पाठवावा किंवा पोहचवावा.

2. खालील पहिल्या अनुसूचीत ज्यांचा तपशिल दर्शविण्यात आला आहे अशा सहायक मतदार नोंदणी अधिकारी / पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे देखिल अर्ज पाठविता येतील.

**पदवीधर मतदार संघाची मतदार यादी प्रत्येक निवडणूकीपुर्वी नव्याने तयार करणे आवश्यक असल्यामुळे या मतदार संघातील सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार यादीत ज्या व्यक्तिंची नांवे समाविष्ट आहेत अशा सर्व व्यक्तिंनी सुध्दा विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करावा.**

**अर्हता** :- जी व्यक्ति भारताची नागरिक आहे आणि त्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि ती व्यक्ती 1 नोव्हेंबर 2022 पुर्वी (अर्हता दिनांक) किमान तीन वर्ष भारतातील विद्यापिठाची एकतर पदवीधर असेल किंवा त्याच्याशी समकक्ष असलेली अर्हता धारण करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ति मतदार यादीमध्ये नांव समाविष्ट करण्यास पात्र आहे. उक्त समकक्ष अर्हतांची सुची या खालील पहिल्या अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या अधिका-यांकडे उपलब्ध आहे. <u>तीन वर्षाचा कालावधी हा ज्या दिनांकास अर्हताकारी पदवी परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला असेल आणि तो विद्यापीठ किंवा अन्य संबंधीत प्राधिकरण यांच्याकडून प्रसिध्द करण्यात आला असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल.</u>

3. नमुना 18 मधील ( अनुसूची दोनला जोडलेला) अर्ज कोणत्याही परिस्थितीत खालील पैकी कोणत्याही एका लेखी पुराव्यानिशी सादर केलेले असावे.

(अ) विद्यापीठ किंवा संबंधीत संस्था यांनी दिलेले मुळ पदवी / पदविका प्रमाणपत्र किंवा यथोचित रित्या स्वयंसांक्षांकित आणि यथोचितरित्या कोणताही अतिरीक्त पदनिर्देशित अधिकारी जो (अ) तहसिलदार (ब) शासकीय पदवी महाविद्यालये/आंतर महाविद्यालये यांचे प्राचार्य (क) मुलींचे शासकीय पदवी महाविद्यालये / आंतर महाविद्यालये यांचे प्राचार्य (ड) सर्व गटांचे सहगट विकास अधिकारी (ई) नगरपालिका / नगरपंचायतीचे (राजपत्रित) मुख्याधिकारी (फ) संबंधीत जिल्हयाचे सर्व राजपत्रित अधिकारी, (फ) नोटरी पब्लीक यांनी यथोचितरित्या प्राधिकृत केलेली प्रत.

ब) शासकीय अभिलेखातील एखाद्या नोंदीची प्रत किंवा कार्यालयाच्या राजपत्रित प्रमुखांच्या अभिरक्षेतील शासकीय अभिलेखांमधील नोंदीच्या आधारे तिसऱ्या अनुसूची (Third Schedule) खालील म्हणून जी पुन्हा सादर करणेत आली आहे त्या अनुसूचीतील विहीत नमुन्यामध्ये कार्यालयातील राजपत्रित अधिकाऱ्याने पदवीधर कर्मचाऱ्यांना दिलेले प्रमाणपत्र किंवा संबंधित कार्यालय प्रमुखाने यथोचितरित्या स्वाक्षरीत केलेली, दावा सांगणाऱ्या व्यक्तीने धारण केलेली पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र विनिर्दिष्ट करणाऱ्या संविधानिक मंडळ, महामंडळ किंवा सार्वजनिक उपक्रम यांच्या अभिलेखातील नोंदीची प्रत किंवा

क) विद्यापीठाने दिलेली नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणीपत्राची साक्षांकित प्रत किंवा अधिवक्त्याच्या यादीतील नोंदणीकृत पदवीधराच्या सुचीमधील, वैद्यकीय व्यावसायिकांच्या नोंदवहीतील, सनदी लेखापालांच्या नोंदवहीतील, अभियंता संस्थेने ठेवलेल्या अभियंता नोंदवहीतील संबंधीत नोंदीची प्रमाणित प्रत किंवा

ड) दावा सांगणाऱ्याचे प्रतिज्ञापत्र व त्या पृष्ठ्यर्थ विद्यापीठाच्या कुलसचिवांने किंवा कोणत्याही विद्यापीठांच्या कुलसचिवांने किंवा कोणत्याही विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयाच्या प्राचार्याने किंवा तो ज्या महाविद्यालयात शिकत होता, त्या महाविद्यालयातील विभाग प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र

इ) संबंधित विद्यापीठाने किंवा संस्थेने दिलेली मुळ गुणपत्रिका यथोचितरित्या स्वयंसाक्षांकित केलेली आणि अतिरीक्त पदनिर्देशित अधिकाऱ्याने यथोचितरित्या अधिप्रमाणीत केलेली तिची कोणतीही प्रत, परंतू असे की, दावा सांगणाऱ्याने संबंधीत परिक्षा उत्तीर्ण केली आहे असे स्पष्ट दर्शविणारी असावी.

4. पात्र व्यक्तींनी खाली देण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार वरील परिच्छेद 3 मध्ये सूचिबध्द करण्यात आलेल्या सहाय्यभुत दस्तऐवज / कागदपत्रांसह, विहीत नमुना 18 मध्ये त्यांच्या नावनोंदणीसाठी अर्ज केला पाहिजे :-

अ) निवडणूक निर्णय अधिकारी / सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी / पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे टपालाद्वारे अर्ज पाठविण्यात आल्यास, अर्जदाराने अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेल्या आणि अतिरीक्त पदनिर्देशित अधिकाऱ्याने यथोचितरित्या अधिप्रमाणीत केलेल्या त्याच्या पदवी/प्रमाणपत्र/गुणपत्रिका याची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

ब) अर्जदाराने या प्रयोजनाकरीता यथोचितरित्या नियुक्त केलेल्या पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष त्याचा अर्ज सादर केल्यास, तो पदनिर्देशित अधिकाऱ्यासमोर मुळ पदवी/प्रमाणपत्र/गुणपत्रिका सादर करील.

5. जेथे वरील कार्यपध्दती अनुसरण्यात आलेली नाही असा कोणताही अर्ज अपुर्ण समजून मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून तात्काळ नाकारण्यात येईल.

6. एकत्रित स्वरुपातील अर्ज मग ते व्यक्तिश: सादर केलेले असोत किंवा पोस्टाद्वारे सादर केलेले असोत **मतदार यादीत नाव** समावेश करण्यासाठी मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडून विचारात घेतले जाणार नाहीत. तथापि, संस्था प्रमुख, त्यांच्या संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे अर्ज एकत्रित पुढे पाठवू शकतात. कुटुंबाच्या एका सदस्यास त्याच्याच कुटुंबातील इतर सदस्यांचे अर्ज दाखल करता येतील आणि अशा प्रत्येक सदस्याच्या बाबतीत मुळ प्रमाणपत्रावरुन पडताळणी केलले प्रमाणपत्र किंवा यथोचितरित्या स्वयंसाक्षांकित केलेले आधारभूत दस्तऐवज आणि अतिरीक्त पदनिर्देशित अधिकाऱ्याने यथोचितरित्या अधिप्रमाणीत केलेल्या आधारभूत दस्तऐवज यासह नमुना 18 सादर करता येईल.

7. कोणतीही व्यक्ती जी गोष्ट खोटी असून ती खोटी असल्याचे एकतर तिला ज्ञात असेल किंवा ती समजत असेल किंवा जी खरी असल्याचे ती समजत नसेल त्या गोष्टींबाबत अर्जात एखादे निवेदन किंवा अभिकथन करील. ती व्यक्ती लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1950 चे कलम 31 अन्वये शिक्षेस पात्र असेल, याची नोंद घ्यावी.

8. नमुना 18 मधील छापील अर्ज मतदार नोंदणी अधिकारी/सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी/पदनिर्देशित अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मिळविता येतील. हस्तलिखीत, टंकलिखीत, चक्रमुद्रीत किंवा खाजगीरित्या छापलेले, डाऊनलोड केलेले नमुनेदेखील स्वीकारले जातील.

विभागीय आयुक्त
तथा मतदार नोंदणी अधिकारी
अमरावती विभाग पदवीधर मतदार संघ, अमरावती